# विवेकानंद कॉलेज माजी विद्यार्थी असोसिएशन-
## बैठक इतिवृत्तांत

दि- ३१/०७/२०२३

(1) आज दिनांक ३१/०७/२०२३. रोजी विवेकानंद कॉलेज माजी विदयार्थी असोशिएशन, कोल्हापूर या संस्थेची सभा घेणेत आली. सदर सभेमध्ये संस्थेच्या जमा खर्चा व कार्यक्रमा बाबत चर्चा आली तसेच या सभेमध्ये आलेल्या विषयावर काही चर्चा विनिमय होउन खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले आहेत.

विषय :- १ मागील सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे

ठराव क्र :- १ संस्थेच्या मागील सभा दि:-                रोजी आलेल्या सभेचा वृत्तांत या सभेत वाचून दाखवणेत आला. त्यामधील सर्व नोंदी योग्य असलेने सर्वानुमते ते कायम करणेत यावे असे ठरविणेत आले.

सही

सूचक :- श्री उबाळे जी. एस

अनुमोदक :- नंदकुमार रामचंद्र रानभरे

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र: २ अध्यक्ष व सदस्य यांचे राजीनामेबाबत चर्चा करणे.

ठराव क्र - २ संस्थेचे अध्यक्ष श्री. प्रा. हिंदुराव बाबुराव पाटील व सदस्या कु. संपदा अरुणकुमार माने यांनी संस्थेकडे अनुक्रमे दि:-                व दि:-                रोजी त्यांचे वैयक्तिक कारणामुळे पदाचा राजीनामा दिलेने त्याविषयी या सभेत चर्चा आली. त्यानुसार सदर पदाधिकारी यांची वैयक्तीक अडचण लक्षात घेवून त्यांचे राजीनामे हे सर्वानुमते मंजूर करणेत आले.

सूचक :- धीरज सुरेश शिंदे

अनुमोदक :- सुनिल भोसले

ठराव सर्वानुमते मंजूर

आज दिनांक २८/१२/२०१८ रोजी विवेकानंद कॉलेज माजी विद्यार्थी असोशिएशन, कोल्हापूर या संस्थेची सभा घेणेत आली. सदर सभेमध्ये खर्चाबावत, व राजीनामे या बाबत चर्चा झाली. तसेच या सभेमध्ये सदर विषयाबाबत चर्चा होवुन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले आहेत.

विषय :- ③ मागील सभेचा वृत्तांत वाचुन कायम करणे.

१० ठराव क्र. ③ संस्थेच्या मागील सभा दि. ३०/१२/१८ रोजी आलेल्या सभेचा वृत्तांत या सभेत वाचुन दाखवणेत आला. त्यामधील सर्व नोंदी योग्य असलेने सर्वानुमते ती कायम करणेत यावे असे ठरविणेत आले.

सूचक :- श्री उबाळे जी. एस. [signature]
अनुमोदक श्री. सुनिल भोसले [signature]

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय :- ४ खर्चास मंजूरी देणेबाबत चर्चा करणे.
ठराव :- ४ संस्थेच्या दैनंदिन कामकाजावर आलेल्या खर्चाचा तपशील सभेत मांडण्यात आला. त्यामधील मजकूर खरा व बरोबर असलेने सर्वानुमते तो मंजूर करणेत आला.

सूचक :- नंदकुमार रामचंद्र रानभरे [signature]
अनुमोदक :- श्री उबाळे जी. एस [signature]

ठराव सर्वानुमते मंजूर

दि: ३१/७/२०१७

विषय क्र.: ५ रिक्त पदी नविन पदाधिकारी नेमणेबाबत

ठराव क्र.: ५ संस्थेच्या अध्यक्ष श्री.प्रा. हिंदुराव बाबुराव पाटील व सदर सदस्या कु. संपदा अरुणकुमार माने यांनी राजीनामे दिलेने व ते दि. ३० रोजीच्या सभेत मंजूर झालेने सध्या रिक्त पदी नविन पदाधिकारी नेमणे आवश्यक असलेने त्याविषयी या सभेत सविस्तर चर्चा होऊन सभासदांमधून अध्यक्ष म्हणून श्री.प्रा. सिताराम चव्हाण होणगेकर यांची व सदस्य म्हणून श्री. मयुर वसंतराव पाटील यांची सर्वानुमते निवड करणेत आली. व तसे जाहीर करणेत आले.

सुचक: श्री. सुनिल गुंगा भोसले, Bhosale

अनुमोदक श्री धीरज सुरेश शिंदे, D.Shinde

ठराव सर्वानुमते मंजूर करणेत आला.